महावितरण

क्र.साप्रवि/रवका/मराठीभाषा/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
**रचना व कार्यपध्दती कक्ष,**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबइ - ४०० ०१९.

दिनांक :२/३/२००६

**प्रशासकीय परिपत्रक क्रमांक- २३**

विषय :मराठी भाषेतील कामकाजासाठी / पत्रव्यवहारासाठी संगणकावर वापरावयाच्या सॉफ्टवेअर बाबत.

---

महाराष्ट्र शासनाच्या धोरणास अनुसरुन मुख्य कार्यालय, क्षेत्रिय कार्यालयाकडून विविध माहिती मराठीत मागवित असते. सदरची माहिती संगणकावर टंकलिखित करुन ब-याचदा फ्लॉपी किंवा सीडीच्या स्वरुपात मागविली जाते. अशा फ्लॉपी किंवा सीडीच्या स्वरुपात सादर केलेल्या माहितीचा अभ्यास केला असता, असे निदर्शनास आले की, विविध क्षेत्रिय कार्यालये मराठी भाषेच्या वापरासाठी संगणकावर निरनिराळ्या सॉफ्टवेअरचा वापर करीत असल्याने, क्षेत्रिय कार्यालयांकडून बोलाविण्यात आलेल्या फ्लॉपी किंवा सीडीच्या स्वरुपात असलेली माहिती मुख्यालयातील संगणकावर वाचता येत नाही. त्यामुळे फ्लॉपी किंवा सीडीच्या स्वरुपात माहिती मागविण्याचा मूळ हेतू साध्य होत नाही. शिवाय आत्यंतिक तातडीच्या परिस्थितीत शासनाच्या संकेतस्थळावरही सदरची माहिती थेट पुरविणे शक्य होत नाही.

उपलब्ध परिस्थितीचा आढावा घेवून मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी अशा सूचना दिल्या आहेत की, क्षेत्रिय कार्यालयांनी व मुख्य कार्यालयातील सर्व विभागानी मराठीत द्यावयाची संगणकीय माहिती ही ISM मध्ये असावी. यासाठी शक्य तो DVB-TT Surekh या फॉंटचा वापर करावा.

तरी सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या संगणकावर ISM सॉफ्टवेअर कार्यान्वित करण्यासंबंधी तातडीने कार्यवाही करावी व लवकरच होणार असलेल्या विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाशी व शासनाशी संबधित वेळीवेळी मुख्यालयातर्फे जी माहिती मागविण्यात येईल ती न चुकता ISM फॉंटचाच वापर करुन तयार करावी. त्याचप्रमाणे ISM सॉफ्टवेअर बाबत मुख्य महाव्यवस्थापक(माहिती तंत्रज्ञान) यांचे पत्र क्र.एचओ/आय.टी./१५० दि. २/३/२००६ अन्वये देण्यात आलेल्या सूचनांचे पालन करावे.

उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घ्यावी.

**( सु. य. पाटील )**
**मुख्य महाव्यवस्थापक(क)**

प्रत :
वितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे विभागीयस्तराव वरील सर्व कार्यालयांना